MHBI120007412016

## नियमीत दिवाणी दावा क्र.१५२/२०१६ मधील नि.क्र. ५० खालील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.७ यांनी वादीतर्फे साक्षीदार क्र.१ यांचा उलटतपास नाही, असा दिनांक १५.०४.२०२३ रोजी झालेला आदेश रदद करुन मिळावा यासाठी दाखल केलेला आहे.

२. उपरोक्त प्रतिवादी यांनी असे नमुद केले आहे की, प्रस्तुत प्रकरणात वादीने दि.२९.०३.२०२३ रोजी सरतपासाचे शपथपत्र दाखल केले होते परंतु अनावधानाने ते प्रतिवादी क्र.७ यांना माहित नव्हते. त्यामुळे मा.न्यायालयाने दि.१५.०४.२०२३ रोजी प्रतिवादी क्र.७ विरूध्द विना उलटतपासाचा आदेश केलेला आहे. प्रस्तुतचे प्रकरण हे हक्कजायदातीचे असून त्यामध्ये योग्य असे न्यायदान होण्याकरीता वादीचा उलटतपास घेणे गरजेचे आहे. त्यामुळे उलटतपास नाही हा आदेश रदद करुन मिळावा अशी विनंती केली आहे.

३. अर्जास वादी यांनी अर्जाच्या पाठीमागील बाजूस त्यांचे म्हणणे दाखल केले आहे. वादी यांचे म्हणणे असे आहे की, वादीने दि.२९.०३.२०२३ रोजी साक्षीपुरावा दिल्यानंतर मा.न्यायालयाने दि.१५.०४.२०२३ रोजी प्रतिवादी क्र.६ व ७ यांनी उलटतपास घेतला नाही म्हणून आदेश पारीत केलेला असून प्रस्तुत अर्जामध्ये दि.१५.०४.२०२३ पासून दि.१९.०९.२०२५ पर्यंत कोणतेही असे सक्षम कारण प्रतिवादी क्र.७ च्या अर्जात नसून कागदोपत्री पुरावाही जोडलेला नाही. प्रस्तुत दावा जुना असून दावा प्रलंबीत ठेवण्याचा प्रतिवादीचा उद्देश दिसत आहे. सबब अर्ज नामंजुर करण्याची विनंती वादी यांनी केली आहे.

४. अर्ज, म्हणणे व अभिलेखावरील दाखल कागपत्रांचे अवलोकन केले. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला.

५. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वादी यांनी प्रतिवादी यांच्याविरुध्द प्रस्तुतचा दावा अतिक्रमीत जमिनीचा ताबा मिळून खरेदीखत

क्र.६२५/२०१६, दि.१३.०५.२०१६ रद्द करून कायम मनाई हुकूम मिळणेसाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुत प्रकरणातील वाद मुददे दिनांक २९.०३.२०२३ रोजी काढण्यात आलेले असून त्याच दिवशी वादीतर्फे साक्षीदार क्र.१ यांचे पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्र.४२ अन्वये दाखल झाल्यानंतर प्रतीवादी क्र.७ यांना उलटतपास घेण्यासाठी संधी देण्यात आली आहे. तरी सुध्दा दिनांक १५.०४.२०२३ रोजी प्रतिवादी क्र.७ उलटतपास घेवू न शकल्याने त्यांच्याविरुध्द वादीतर्फे साक्षीदार क्र.१ चा उलटतपास नाही असा आदेश करण्यात आलेला आहे. असे असले तरी प्रतिवादी क्र.७ यांना साक्षीदाराचा उलटतपास घेण्याची संधी दिल्यास दाव्याचा गुणदोषावर निकाल करणे शक्य होणार आहे. तथापी त्याचवेळी दाव्याचे काम चौकशीसाठी प्रलंबित असताना प्रतिवादीने सदरचा अर्ज देवून दाव्याच्या कामी केलेल्या विलंबाबाबत वादीस खर्चाची रक्कम वसुल होवून मिळणे देखील न्यायाचे व गरजेचे आहे. प्रस्तुत प्रकरणातील वाद विषय व झालेला विलंब लक्षात घेता वादी यांना खर्चाची रक्कम रु.३००/– देणे न्यायोचित होईल. सबब मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## **आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र.७ यांनी वादी यांना रक्कम रु.३००/– एवढा खर्च दिल्यानंतर उलटतपास नाही, असा दिनांक १५.०४.२०२३ रोजी झालेला त्यांच्या विरुध्दचा आदेश रदद करण्यात येत आहे.

३. सदर खर्चाची रक्कम प्रतिवादी ७ यांनी पुढील तारखेपर्यत वादीला अदा करावी अन्यथा सदरचा आदेश रदद समजणेचा आहे.

NILESH MALAKAPPA WALI
Digitally signed by NILESH MALAKAPPA WALI
Date: 2025.12.03 16:55:13 +0530

स्थळ–धारुर
दिनांक ०१.१२.२०२५

(निलेश एम. वाली )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
धारुर

## :: **<u>Certificate of Stenographer</u>** ::

“ I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Order/judgment. ”

Sd/-
(Amol D. Mule )
Stenographer (Grade – 3)
C.J.J.D. & J.M.F.C. Court, Dharur